आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी-३.०० वाजता

१४ डिसेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या नागपुरात होणार

- तारणाविना कृषी कर्जाच्या मर्यादेत ४० हजार रुपयांनी वाढ

- ‘एक देश-एक निवडणूक’शी संबंधित दोन विधेयकं लोकसभेत सोमवारी सादर केली जाणार

- देशातल्या सर्व मुख्य सचिवांची परिषद प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सुरु

**आणि**

- रत्नागिरी जिल्ह्यातल्या जयगडमधल्या वायुगळतीप्रकरणी जिंदाल कंपनीच्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**<><><><><>**

राज्यातल्या नवनिर्वाचित सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या रविवारी सायंकाळी चार वाजता नागपूर इथं राजभवनात होणार आहे. राजभवनातून ही माहिती देण्यात आली. येत्या सोमवारपासून राज्य सरकारचं हिवाळी अधिवेशन नागपुरात होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला हा मंत्रिमंडळ विस्तार केला जाणार आहे. दरम्यान, मंत्र्यांची यादी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली असून तेथून मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित आमदारांना

सूचित केलं जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना दिली.

यापूर्वी ५ डिसेंबर रोजी मुंबईत एका भव्य समारंभात देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत नवं सरकार स्थापन केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं रस्ते सुरक्षा आणि महामार्गावरची गस्ती आणखी वाढवण्याच्या उद्देशाने महामार्गावर ‘राजमार्ग साथी’ या नावानं नवीन गस्ती वाहनं सुरु केली आहे. ही वाहनं आधुनिक तंत्रज्ञान आणि सुरक्षा उपकरणांनी  सुसज्ज असून यामुळे वाहतूक कोंडी कमी व्हायला आणि प्रवास सुरक्षित व्हायला मदत होणार आहे. यात बसवलेल्या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून वाहतूक कोंडी, रस्त्यांवरचे खड्डे आणि इतर अडथळे शोधायलाही मदत होणार आहे.

**<><><><><>**

अभिव्यक्ती आणि संवाद यांचा मध्य साधेल अशाप्रकारे भारतीय लोकशाही केंद्रस्थानी आणणं आवश्यक असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत टपाल आणि दूरसंचार लेखा आणि वित्त सेवेच्या  ५० व्या स्थापना दिन कार्यक्रमात बोलत होते. अभिव्यक्ती आणि संवाद परस्परांना पूरक असून दोन्हींमधील सुसंवाद ही यशाची गुरुकिल्ली असल्याचं धनखड यांनी सांगितलं.

**<><><><><>**

'एक देश-एक निवडणूक'शी संबंधित दोन विधेयकं लोकसभेत सोमवारी सादर केली जाणार आहेत. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल संविधान सुधारणा विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा सुधारणा विधेयक लोकसभेत मांडतील. 'एक देश – एक निवडणूक' या संकल्पनेची पडताळणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारसी नुकत्याच सरकारने स्वीकारल्या असून देशभरात एकाचवेळी निवडणूका घेण्याचा मार्ग मोकळा झाला  आहे.  माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने विविध राजकीय पक्षांसह तज्ज्ञांशी याबाबत विस्तृत चर्चा केली. या अंतर्गत निवडणूक प्रक्रिया दोन टप्प्यात राबवली जाईल. पहिल्या टप्प्यात लोकसभेची निवडणूक आणि सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका घेतल्या जातील. तसंच या निवडणुका झाल्यानंतर शंभर दिवसांच्या आत दुसऱ्या टप्प्यात  स्थानिक स्वराज्य  संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातील.

**<><><><><>**

लोकसभेत आज भारतीय संविधानाच्या पंच्याहत्तर वर्षांनिमित्त आयोजित विशेष चर्चासत्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे सहभागी होणार आहेत. आज चर्चासत्राची सुरुवात संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजेजू यांनी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानाचं त्यांनी यावेळी कौतूक केलं. देशाने स्वातंत्र्यानंतर प्रत्येक नागरिकाला समान अधिकार दिले आहेत. अल्पसंख्याकांसोबत कोणताही भेदभाव केला जात नाही आणि त्यांना कायदेशीर संरक्षण असल्याचं रिजिजू म्हणाले. देशातील सहा अल्पसंख्याक समुदायांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या जात असल्याचंही त्यांनी

म्हटलं आहे. काल या चर्चासत्रात केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह विविध पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी आपापले विचार मांडले.

**<><><><><>**

देशातल्या सर्व मुख्य सचिवांची चौथी राष्ट्रीय परिषद नवी दिल्लीत होत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी परिषदेच्या अध्यक्षस्थानी आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांमधला ताळमेळ वाढवण्याच्या दृष्टीनं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून या परिषदेची सुरुवात झाली. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेची संकल्पना उद्योजकता, रोजगार आणि कौशल्यविकासाला प्रोत्साहन – लोकसंख्या समीकरणाचे फायदे अशी आहे. परिषदेला काल प्रारंभ झाला असून आज समान विकास आराखड्यावर राज्यसरकारांच्या सहभागातून काम याविषयावर आज चर्चा होत आहे. सर्व राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, आणि विविध क्षेत्रातले तज्ञ परिषदेला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

'दि ग्रेट शोमन' या नावानं परिचित असलेल्या चित्रपट निर्माते, दिग्दर्शक राज कपूर यांच्या जन्मशताब्दी वर्षाला आज सुरुवात झाली. भारतीय चित्रपट विश्वाला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जाण्यात राज कपूर यांचा मोठा वाटा आहे. आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून मनोरंजनाबरोबरच सामाजिक आशयही वृद्धिंगत करण्यात त्यांच्या चित्रपटांनी महत्वपूर्ण योगदान दिलं. केवळ भारतातच नव्हे तर विशषत्वाने रशियासह जगभरातल्या चित्रपट रसिकांनी राज कपूर यांच्या चित्रपटांना अखंड दाद दिली आहे. चित्रपट निर्मिती आणि दिग्दर्शनासह अभिनेता या रूपातही त्यांनी रसिकांना अपार आनंद दिला. राज कपूर यांच्या देदीप्यमान कारकिर्दीबद्दल त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारानं गौरवण्यात

आलं होतं. भारतीय चित्रपटसृष्टीतले स्टार म्हणून दिलीपकुमार, देव आनंद आणि राज कपूर ही त्रिमूर्ती बराच काळ किर्तीच्या शिखरावर आरूढ राहिली. २ जून १९८८ रोजी वयाच्या ६३ व्या वर्षी राज कपूर यांनी इहलोकीची यात्रा संपवली. त्यांच्या जाण्याने केवळ चित्रपटसृष्टीच नव्हे तर संपूर्ण मनोरंजन विश्व पोरकं झालं.

**(व्हाईस कास्ट)...**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिग्गज अभिनेता राज कपूर यांच्या शतकमहोत्सवी जयंतीनिमित्त त्यांना श्रद्धांजली वाहिली. राज कपूर हे केवळ चित्रपट निर्मातेच नव्हते तर सांस्कृतिक दूत होते. त्यांनी भारतीय सिनेमाला जागतिक मंचावर ओळख दिली, अशा शब्दांत प्रधानमंत्री मोदी यांनी समाज माध्यमांवरील एका पोस्टद्वारे राज कपूर यांची प्रशंसा केली. राज कपूर यांचे सिनेमे कला, भावना आणि सामाजिक भाष्यासह सामान्यांच्या आकांक्षा आणि संघर्षाचे चित्रण करत, असे सांगत प्रधानमंत्र्यांनी राज कपूर यांच्या सिनेमांतील अजरामर भूमिका आणि सुमधूर गाण्यांचाही उल्लेख केला.

**<><><><><>**

फिनिक्स फाऊंडेशन या संस्थेतर्फे दिवंगत शेतकरी नेते शरद जोशी आणि दिवंगत माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या नावे राष्ट्रीय स्तरावरचे कृषीपुरस्कार सुरु केले जातील असं राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगितलं आहे. फिनिक्स फाऊंडेशनचे अध्यक्ष या नात्याने लातूर जिल्ह्यात लोदगा इथं काल या दोन नेत्यांच्या अभिवादन सभेत ते बोलत होते.

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठात दुहेरी पदवी, सह पदवी आणि ट्विनिंग पदवी शिक्षणासाठी विद्या परिषदेनं मंजुरी दिली आहे. यानुसार विद्यार्थ्यांना दोन महाविद्यालयं किंवा उच्च शिक्षण संस्थांमध्ये एकत्र प्रवेश घेता येणार आहे. यामुळे शिक्षण प्रणालीमध्ये मोठा बदल होणार असून सर्वोत्कृष्ट शैक्षणिक पद्धतीच्या सामायीकीकरणाला प्रोत्साहन मिळेल, असं मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितलं. त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यापीठात प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसच्या पदांच्या नियुक्तीलाही विद्या परिषदेनं मान्यता दिली आहे.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यातल्या जयगडमधल्या वायुगळतीप्रकरणी जिंदाल कंपनीच्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याच्या सूचना आमदार उदय सामंत यांनी प्रशासनाला केल्या होत्या. त्यानुसार तहसीलदार राजाराम म्हात्रे यांनी जिंदाल कंपनीचे दोन व्यवस्थापक आणि दोन अभियंत्यांविरुद्ध जयगड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. नियमित देखभाल-दुरुस्तीचं काम करताना निष्काळजीपणा केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. दोन दिवसांपूर्वी ही वायुगळती झाली होती. दरम्यान, बाधित सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असून, ६९ पैकी २८ विद्यार्थ्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं आहे.

<><><><><>

महिला कनिष्ठ गट हॉकी आशिया चषक स्पर्धेत आज भारताचा सामना जपानबरोबर होणार आहे. ओमानची राजधानी मस्कत इथं ही स्पर्धा होत असून गेल्या गुरुवारी थायलंडवर भारताने ९ - ० असा दणदणीत विजय मिळवला

होता. या विजयामुळे भारत उपांत्यफेरीत पोहोचला, तसंच पुढच्या वर्षी चिलीमधे होणाऱ्या एफआयएच कनिष्ठ गट जागतिक हॉकी स्पर्धेसाठी देखील पात्र ठरला आहे. आजचा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी ६ वाजता सुरु होईल. दुसरा उपान्त्य सामना चीन आणि दक्षिण कोरियामधे होणार आहे.

**<><><><><>**

दत्तजयंतीनिमित्त आज राज्यात विविध दत्तमंदिरांमध्ये उत्सवांचं आयोजन करण्यात आलं आहे. आरत्या, भजन, कीर्तन यांसह दत्तयागासारखे धार्मिक कार्यक्रम होत आहेत. अनेक मंदिरांमधे या निमित्ताने तीन ते चार दिवसांचे उत्सव होतात.

**//<><><><><>//**